सकाळ

# डिजिटायझेशनमुळे विमा घेणे सोपे

## रिलायन्स जनरल इन्शुरन्सच्या सीईओंचे मत


राकेश जैन

मुंबई, ता. ९ : विमा क्षेत्रात डिजिटायझेशन आल्यामुळे वेबसाईटवर किंवा फोनवरच ग्राहकांना विमापॉलिसीचा सर्व तपशील दिसू लागला आहे. त्यामुळे आपल्याला अमुक गोष्ट माहिती नव्हती, अशी ग्राहकांची तक्रार नाहिशी झाली असून डिजिटायझेशनमुळे विमा क्षेत्रात पारदर्शकता आली, असा दावा रिलायन्स जनरल इन्शुरन्सचे सीईओ राकेश जैन यांनी 'सकाळ'कडे केला.

विमा क्षेत्रात आम्ही सर्वप्रथम डिजिटायझेशन आणले. आता इर्डाच्या आदेशामुळे सर्वांनीच डिजिटायझेशन केले आहे. डिजिटायझेशनमुळे लोकांना माहिती मिळणेही अत्यंत सोपे झाले आहे. डिजिटायझेशनमुळे सर्वत्र शाखा उघडणे, फायलींचा ढीग ठेवणे याचीही गरज उरली नाही. त्यामुळे काम तर व्यवस्थित आणि वेगाने होतेच, पण डिजिटायझेशन केलेल्या कंपन्या ग्राहकांना किफायतशीर दरात जास्त विमाछत्र तसेच समाधान आणि पारदर्शकता देतात, असे जैन यांनी दाखवून दिले.

कोविडकाळात आरोग्य विम्यासंदर्भात लोकांमध्ये जागरूकता आली. मात्र आपण राहतो त्या घराच्या विम्यासंदर्भात जागरूकता येणे गरजेचे आहे. आपल्या इमारतीची सहकारी सोसायटी इमारतीचा विमा काढते, मात्र घराचा विमा वेगळा असतो. घराला आग लागू शकते, महापुराने नुकसान होते, हे टाळण्यासाठी घराचा विमाही गरजेचा आहे. तसाच वैयक्तिक किंवा आरोग्य विमाही तरुणपणीच काढावा. आजारी पडल्यावर विम्याची आठवतो, तसे करू नये. अनेक कुटुंबांमध्ये फक्त कर्त्या पुरुषाचाच विमा काढला जातो, त्यामुळे इतर कुटुंबीयांच्या विम्यासाठीही आम्ही त्यांना हप्त्यांमध्ये सवलत देतो, असेही त्यांनी सांगितले.

### जीवनशैली सुधारण्यासाठी विमा आवश्यक!

विमा ही गुंतवणूक किंवा बचत नसते तर रिस्क ट्रान्सफर असते. उदा. तुम्ही गावात राहात असाल तर तेथील रुग्णालयात वैद्यकीय खर्च कमी असतो, त्यामुळे तेथे विमाहप्ता कमी असणार, पण मुंबईत विमाहप्ता जास्त येणार. हे समजूनच विमा काढा. आपली जीवनशैली सुरक्षित ठेवण्यासाठी विमा घ्या, असेही प्रतिपादन जैन यांनी केले.